Historicity Research Journal  Impact Factor : 1.4152 (UIF)
ISSN : 2393-8900  Volume - 3 | Issue - 4 | December – 2016

# वीरशैव संप्रदाय आणि श्रीसिध्दरामेश्वर

**डॉ. अमिता नवनाथ नागणे**
**छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर.**



**प्रस्तावना:-**

प्राचीन महाराष्ट्रातील शिवोपासक संप्रदायापैकी लिंगायत हा एक संप्रदाय आहे. कर्नाटक व महाराष्ट्राच्या सरहद्दीवर बेळगांव, सोलापूर, कोल्हापूर, सांगली या परिसरात मोठ्या प्रमाणावर हा संप्रदाय विस्तारलेला आहे.[१] शिव हे या संप्रदायाचे आराध्य दैवत असून, शिवाची अन्योन्यभक्ती हे या संप्रदायाचे प्रमुख साध्य आहे. दक्षिणेत भक्तीच्या पायावर अधिष्ठित असलेली शिवोपासना कितीतरी प्राचीन काळापासून रूढ आहे. वीरशैवांच्या भक्तीमागे विशिष्ट तत्त्वज्ञान, आचार, सामाजिक समता, देशी भाषांचा पुरस्कार इत्यादी बाबतीत एक चौकट निर्माण होऊन ती परंपरेने अखंडपणे चालत राहिल्याने या भक्तीमार्गास संप्रदायाचे स्वरूप प्राप्त झाले.[२] वीरशैव आणि लिंगायत या दोन प्रमुख नावानी समाजात परिचीत असलेला हा संप्रदाय लिंगवत, लिंगानुभव, लिंगपंथ, इष्टलिंग, जंगम, शरण, वचन, बसव, शक्ती विशिष्टाद्वैत, षट्स्थळ, आगम, शिवानुभव, शिवपथ, शिवसमय, शिवाद्वैत, शिवाचार, शिवयोग, शिवधर्म अशा विविध नावांनी ओळखला जातो.[३]

अल्लमप्रभुची वीरशैव प्रणाली, रेवणसिध्द, मरूळसिध्द इत्यादींच्या शिष्य परंपरेने बसवेश्वरांपर्यंत आल्यानंतर इ. स. ११६० च्या सुमारास बसवेश्वरांनी वीरशैव (लिंगायत) पंथाला निश्चित स्वरूप दिले.[४] लिंगायत लोक हे बसवेश्वरांच्या अगोदर क्वचित ठिकाणीच आढळत होते. इतर मतातील लोकांना वीरशैव मतात आणण्याचे काम बसवेश्वरांनी आरंभिले.[५]

वीरशैव या शब्दातील 'वी' या धातूचा अर्थ व्याकरणकार पाणिनी यांनी 'गती' असा दिला आहे तर काही ग्रंथातून 'वी' धातूचा अर्थ 'विद्या' असा दिला आहे. 'र' चा अर्थ रमणे अर्थात आनंद घेणे असा होतो. 'वी' या शब्दापासून निघणाऱ्या विद्या या अर्थानुसार शिव जीवाचे लिंगाचे एकत्त्व सांगणाऱ्या विद्येत जो शिवभक्त रमतो तोच 'वीरशैव' होय.[६] शैव पंथातून उदयास आलेल्या शिवाला दैवत मानून त्याचे प्रतिक असलेल्या शिवलिंगाची पूजा करणाऱ्या जहाल स्वरूपाच्या धर्माला 'वीरशैव' म्हणून ओळखले जाते.[७] वीरशैवांसाठी लिंगायत हा शब्द सर्वत्र वापरला जातो.अंगावर नित्य लिंगधारणा करण्याच्या प्रथेवरून हा शब्दरूढ झाला आहे. गुरूने दिक्षाविधीतून दिलेल्या इष्टलिंग धारणेशिवाय कोणालाही लिंगायत म्हणता येणार नाही. 'लिंगधारणा' हे वीरशैवांचे प्रमुख आचार लक्षण आहे. सद्गुरूने दीक्षापूर्वक दिलेले 'इष्टलिंग' हे सोने, चांदी, लाकूड इत्यादींपासून बनविलेल्या सज्जिकेत घालून ते जानव्यासारखे गळयात धारण केले जाते.[८] लिंगायत या शब्दाचा मुळ अर्थ (लिंग +आयत) लिंगेन आयत 'लिंगायत' म्हणजेच इष्टलिंग धारण करतो तो लिंगायत होय.[९] लिंगायत पंथांचा ज्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रचार व प्रसार केला त्यामध्ये श्री बसवेश्वर, श्री अल्लमप्रभु, श्री सिध्दरामेश्वर, चन्नबसवेश्वर आणि अक्कमहादेवी या पाच विरक्तांचा समावेश होतो.[१०]

१२ व्या शतकात कर्नाटक राज्यात तत्कालीन समाज व्यवस्थेच्या विरूध्द विद्रोह करणाऱ्या बसवेश्वरांचा जन्म सनातनी हिंदु धर्मीय घराण्यात झाला असला तरी, त्यांनी हिंदु धर्मातील तत्कालीन सामाजिक व धार्मिक वर्णव्यवस्थेला प्रचंड विरोध करुन होम-हवन, यज्ञ, अग्निपूजा निषिध्द मानली.[११] बसवेश्वरांना कोणीही वीरशैवाची दीक्षा दिली नाही तर, ते स्वत:च वीरशैव झाले. त्यांनी नव्या धर्माची स्थापना न करता जुन्या शैववादात क्रांतीकारक बदल घडवून त्यास नवे रूप दिले.[१२] त्यांनी धर्म, वर्ग, वर्ण, वंश, जात, लिंग, व्यवसाय अथवा अन्य सामाजिक भेदभाव आणि त्यातून निर्माण झालेल्या श्रेष्ठ-कनिष्ठ प्रवृत्तींना निकराचा विरोध केला. स्त्री आणि पुरूष यांची योग्यता समान मानावी, दोघांचे हक्कही सारखेच मानावे, प्रत्येक मानावाला व्यवसाय स्वातंत्र्य असून, कोणताही व्यवसाय हा श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असूच शकत नाही. मोक्ष, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य, दैव, कर्म यासारख्या गोष्टी अनुभववादी, प्रत्यक्षवादी, विज्ञानवादी दृष्टीकोनातून पाहण्याचा आग्रह बसवेश्वरांनी धरला होता.[१३]

महात्मा बसवेश्वरांनी अठरा-पगड जाती-धर्मातील स्त्री-पुरूषांसाठी वैचारिक चिंतन आणि संवाद करण्यासाठी १२ व्या शतकात कर्नाटकातील कल्याणी येथे 'अनुभव मंटप' नावाचे सामाजिक व सांस्कृतिक विचारपीठ निर्माण केले. या अनुभव मंटपात स्त्री-पुरूष मिळून ७७७ सदस्य होते, त्यामध्ये सुमारे ७७ स्त्रिया होत्या. या सभासदांमध्ये जात, धर्म, पंथ, लिंग, वय, वर्ग, व्यवसाय, भाषा इत्यादींबाबत कोणताही भेदभाव नव्हता या मंटपात सहभागी होणाऱ्या पुरूषांना 'शरण' व स्त्रियांना 'शरणी' असे संबोधले जाई.[१४] भारताच्या कानाकोपऱ्यातून अनेक शिवभक्त आणि शिवयोगी या मंटपात येऊन शिवभक्तीत समरस होत. हा अनुभव मंटप

म्हणजे महात्मा बसवेश्वरांच्या ध्येयदृष्टीचे, कर्तृत्त्वाचे आणि शिवभक्तीचे प्रतिक बनले होते. याविषयी डॉ. निर्मलकुमार फडकुले म्हणतात की, 'अनुभव मंटप म्हणजे १२ व्या शतकातील समतेचे आणि ज्ञानाचे ते धर्मपीठ होते. हे धर्मपीठ देशाला आदर्शभूत ठरले. या अनुभव मंटपाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वरांनी स्त्री - पुरूष समानतेची घोषणा केली.[१५] सोन्नलगीचे (सोलापूर) सिध्दरामेश्वर हे सोलापूर वीरशैवांचे प्रथमगण म्हणून ओळखले जातात, ते ही या अनुभव मंटपात होते.[१६] या अनुभव मंटपाद्वारे सिध्दरामेश्वरांना वीरशैवाचे तत्त्वज्ञान समजल्याने या पंथाचा प्रसार करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. सन ११६२ मध्ये अल्लमप्रभु हे अनुभव मंटपाचे आचार्य असताना त्यांना सिध्दरामेश्वरांनी अनुसरले. श्री अल्लमप्रभु यांनीच सिध्दरामांना कल्याणच्या अनुभव मंटपात नेले होते. [१७]

वीरशैवात वैदिक आणि अवैदिक परंपराशी नाते सांगणाऱ्या अनुक्रमे पंचाचार्य आणि विरक्त या दोन विचारधारा निर्माण झाल्या. महाराष्ट्रातील वीरशैव 'पंचाचार्य' विचारधारेशी समन्वित झाले. कर्नाटकातील वीरशैव 'विरक्त' परंपरेशी संबध्द झाले. सिध्दांत शिखामणीच्या आधारे हा संप्रदाय वैदिक ठरतो.[१८] 'षट्स्थळ' हे वीरशैवांच्या धर्म आणि तत्त्वज्ञान विषयक व्यवस्थेतील तात्त्विक व अध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचे तत्त्व आहे. जीव व शीव यांच्या सामरस्य मार्गातील 'षट्स्थळ' हे एक अध्यात्मिक तत्त्व आहे. 'षट्स्थळ' हा वीरशैवांचा ज्ञानमार्ग व ज्ञानयोग आहे.[१९] सत्, चित्, आनंद या स्वरूपात आढळणारे अद्वितीय परब्रह्म हेच 'शिवतत्त्व' या नावाने ओळखले जाते, त्याचेच दुसरे नाव 'स्थळ' हे आहे. स्थळाचे 'लिंगस्थळ' व 'अंगस्थळ' असे दोन प्रकार पडतात. 'लिंगस्थळ' म्हणजे उपास्यदैवत शिव होय आणि 'अंगस्थळ' म्हणजे उपासक जीव होय. या उपास्य शिवाशी उपासक जीवाचे 'सामरस्य' होणे याला वीरशैव 'लिंगांग सामरस्य' असे म्हणतात. याशिवाय योगांग, भोगांग आणि त्यागांग हे लिंगाचे आणखी तीन भाग सांगितले आहेत. योगांगाने जीवाचा शिवाशी संयोग होतो, भोगांगामुळे जीवाला शिवाशी सायुज्यता प्राप्त होते. त्यागामुळे जीवाची जगाची अनित्यता पटते आणि त्याचा तो त्याग करतो.[२०]

### श्री सिध्दरामेश्वर

श्री सिध्दरामेश्वरांचा जन्म ' सोन्नलीगे ' येथे मुद्दगौडा व सुग्गलादेवी यांच्यापोटी इ. स. ११२७ मध्ये झाला.[२१] सिध्दरामाचे बालपणीचे नांव धुळीमहंकाळ होते हे सिध्दरामेश्वरांच्या कुलदैवताचे नांव आहे.[२२] बाराव्या शतकाच्या दरम्यान बसवेश्वरांचे समकालीन म्हणून श्री सिध्दरामांना ओळखले जाते, त्यांनी महाराष्ट्रात लिंगायत पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केला.[२३] महात्मा बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात अक्कमहादेवी, अल्लमप्रभु, चेन्नबसवण्णा यांच्याबरोबर सिध्दरामेश्वर होते. चेन्नबसवेश्वरांकडून सिध्दरामांना इष्टलिंगाची धारणा आणि षट्स्थळ ज्ञानाचा बोध झाला.[२४] शैवीमताचे श्री सिध्दाराम यांना वीरशैव सांप्रदायात सामील करून घेण्याच्या अगोदर चेन्नबसवने सिध्दरामांना सांगितले होते की, " दुसऱ्या कोणत्याही देव-देवतांची पूजा करू दिली जाणार नाही. तसेच दुसऱ्या देव-देवतांच्या पुजांमध्ये विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींशी ही संबंध ठेवू नये." [२५]

सोन्नलीगेचे सिध्दरामेश्वर सोलापूरातील वीरशैवांचे प्रथमगण म्हणून ओळखले जातात. त्यांची श्रीशैलच्या मल्लिकार्जूनावर अढळ श्रध्दा होती. त्यांनी श्रमदानातून शहरात सिध्देश्वर तलावाची निर्मिती केली. दुष्काळात गाई-गुरे दत्तक घेऊन सांभाळली. दिन-दुबळ्यांसाठी अन्नछत्र चालविले. अंगारे-धुपारे देऊन लुबाडणाऱ्या ढोंगी लोकांपासून भक्तांचे संरक्षण केले. सर्व धर्मीय सामुदायिक विवाह घडवून आणण्याचा अभिनव प्रयोग करून त्या काळात सामाजिक क्रांतीतील आपले योगदान नोंदविले. बसवकल्याणच्या अनुभव मंटपात शरणासोबत आपल्या ज्ञानाचे योगदान देण्यात सिध्दरामांचे नांव अत्यंत आदराने घेतले जाई. सोलापूर परिसरातील परम, आदरणीय, प्राणतत्त्व अशी सिध्दरामेश्वरांची ख्याती व अनुभूती होती.[२६] त्यांनी वीरशैव संप्रदायाच्या प्रसाराबरोबरच ६८ हजार वचने रचल्याचा उल्लेख सापडतो. परंतु यापैकी १३०० वचनेच शिल्लक आहेत. वीरशैव पंथीयांकरीता सिध्दरामांची ही वचने म्हणजे एक अमूल्य ठेवा आहे.[२७] त्यांनी कानडी भाषेतून धर्म जागृतीचाही प्रयत्न केला. त्यांच्यासारख्या सामर्थ्यशाली तत्त्वचिंतकाचे वास्तव्य महाराष्ट्रात असल्याने या भागातील मराठी लोकांना कन्नडिगांच्या सहवासाने धर्म विचारांचा चांगला परिचय झाला.[२८] सोलापूर शहरात असणाऱ्या सिध्दरामेश्वरांच्या चिरंतन स्मारकामुळे व महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रच्या सीमेवर हे शहर असल्याने ते वीरशैव सांप्रदायाचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.[२९] सोलापूर जिल्ह्याच्या शेजारी असलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यात ही या संबंधी १२ शिलालेख सापडले आहेत.[३०]

कपाळावर व सर्वांगावर भस्मलेपन करणे, 'ॐ नमः शिवाय' हा गुरूमंत्र मुखाने म्हणणे, अष्टावरण व पंचाचाराचे पालन करणे, हे महत्त्वाचे आचार या पंथात आहेत. गुरु, लिंग, जंगम, विभूती, रूद्राक्ष, मंत्र, पादोदक आणि प्रसाद ही 'अष्टावरणे' होत. शिवाचार, लिंगाचार, सदाचार, भृत्याचार आणि गणाचार हे लिंगायत धर्मातील 'पंचाचार' आहेत.[३१] सनातन वीरशैव धर्मात अष्टावरण, पंचाचार आणि षट्स्थळ ही तीन प्रमुख तत्त्वे स्वीकारलेली आहेत. ही तीन तत्त्वे क्रमशः साधकाचे अंग, प्राण व आत्मा म्हणून मान्य केले जातात'.[३२] सिध्दरामेश्वरांनीही अष्टावरण चिन्हांची महती सांगितली आहे. त्यांच्या अष्टावरण त्रिविधीत १४४ पदे आहेत.[३३]

रमेंद्रनाथ नंदी यांच्या मतानुसार, सिध्दरामेश्वर हे विजापूर जिल्ह्यातील व्यापारासाठी प्रसिध्द असलेल्या शोलापूर या नगरीचे होते. सुरूवातीच्या वीरशैव संप्रदायाच्या अनुयायांमध्ये त्यांना उच्च स्थान प्राप्त झाले होते. कवि राघवांक रचित 'सिध्दरामपुराणामध्ये' सिध्दरामाच्या जीवनाविषयीची संपूर्ण माहिती मिळते.[३४]

सोन्नलिगे परिसरात सिध्दरामेश्वरांनी ६८ शिवलिंगे आणि १७ मंदिरांची निर्मिती केली.[३५] त्यामध्ये किल्ल्यातील मल्लिकार्जून मंदिरासह शहराच्या आठ दिशांचे आठ गणपती, चार वेशीवर चार काळभैरव इत्यादींचा समावेश होतो. सोलापूर शहरातील प्रसिध्द आणि सर्वात जुने धार्मिक स्थळ म्हणून श्रीमल्लिकार्जून मंदिर ओळखले जाते. सिध्दरामेश्वरांनी हे मंदिर सिध्देश्वर तलावाच्या काठी पश्चिमेकडील बाजूस बांधले होते. श्रीशैल पर्वतावर सिध्देश्वर गुरूदर्शनासाठी गेले असता जे दिव्य तेज त्यांना त्या लिंगात दिसले, त्याची या मंदिरात प्राणप्रतिष्ठापना केली. नंतरच्या काळात या मंदिराच्या सभोवताली आज असणारा सोलापूरचा भूईकोट किल्ला बांधण्यात आला. सिध्दरामेश्वरांनी मल्लिकार्जून मंदिराच्या बाजूला अन्नछत्राची निर्मिती करून रोज येणाऱ्या भाविकांना अन्नदान केले. भूईकोट किल्ला मुस्लिम सत्ताधिशांच्या ताब्यात असताना शिवभक्तांना मल्लिकार्जून मंदिरात जाणे अडचणीचे होऊ लागले म्हणून सन १८२० मध्ये सोलापूर शहरातील प्रसिध्द लिंगायत व्यापारी श्रीमंत धर्माराव थोबडे यांनी किल्ल्यातील मल्लिकार्जून मंदिरातील शिवलिंग आणून त्याची शहरातील बाळीवेशीत प्रतिष्ठापना केली. तेच आजचे बाळीवेशीतील प्रसिध्द मल्लिकार्जूनाचे देवालय होय. किल्ल्यातील मल्लिकार्जून मंदिराचे अवशेष आजही किल्ल्यात पाहावयास मिळतात.[३६] या मंदिराच्या देखभालीसाठी आणि अन्नछत्रासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनी अणदूर विभागातील तीनशे गावातून प्रत्येक घरामागे पायली धान्य गोळा करून काही जिन्नस दान दिल्याचा उल्लेख सापडतो.[३७]

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वराची गड्डा यात्रा फार मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाते.[३८] सोलापूर शहरात भरणाऱ्या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे नंदीध्वज होत. यासच श्री सिध्दरामेश्वराच्या काठ्या अथवा योगदंड म्हणण्याचा प्रघात आहे. योगदंडाचे प्रतिक म्हणून नंदीध्वजाची मिरवणूक काढली जाते. योगदंडाचा मान शहरातील विविध जातीतील लोकांना मिळालेला आहे. सिध्देश्वराची पहिली काठी (नंदीध्वज) ही सिध्देश्वर देवस्थानची असते. दूसरी काठी (नंदीध्वज) ही सिध्देश्वर देवस्थानची असते. दूसरी काठी कसब्यातील देशमूखांची तिसरी काठी लिंगायत माळी समाजाची, चौथी ब्राह्मणांची, पाचवी सुतार लोकांची, सहावी मातंग समाजाची आणि सातवी महार समाजाची असे प्रतिनिधीत्त्व सर्व समाजाला देण्यात आले आहे.[३९] या यात्रेस महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील विविध प्रांतातून लोक हजेरी लावतात. त्यामुळे या यात्रेस राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.[४०]

भक्ती व नीती या तत्त्वांना वीरशैव संप्रदायात विशेष महत्त्व आहे. वीरशैवांनी मूर्तीपूजा व तीर्थयात्रा या रूढ मार्गावर टीका केली असून जंगमालाच जगदीश्वर मानले. पंचसुतकाचे बंधन, जातीभेद, स्त्रियांची शिवाशिव, अग्निपुजा, प्रेतसंस्कार इत्यादी गोष्टी लिंगायत पंथ मानत नाही.[४१] 'एकेश्वरवाद' हे वीरशैव शरणांच्या भक्तीचे महत्त्वपूर्ण तत्त्व होते. वीरशैव संतांनी जगाला ईश्वराचे कार्यागार मानले. तसेच जातीविरहित समाजरचनेचा विचार मांडून माणूस जन्माने नव्हे तर त्याच्या कर्माने ओळखला जातो, असे मत मांडले.[४२]

## संदर्भ


१. शेणोलीकर, देशपांडे, महाराष्ट्राचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास, के सागर प्रकाशन, पुणे, २००६, पृ. १६६.

२. गोसावी र. रा., पाच भक्ती सांप्रदाय, १९७४, पृ. ३७७.

३. घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, साधना बुक स्टॉल, गडहिंगलज, २०००, पृ. ६.

४. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६७.

५. नालवार जगदीश शास्त्री, वीरशैवांची स्थिती, १९४५, पृ. ४.

६. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३७८.

- दैनिक दिव्य मराठी, सोलापूर, ३१ जुलै २०१३.

७. शाबादे रेवण, करूणाघन महात्मा बसवेश्वर, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २००९, पृ. ११९.

८. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८२.

९. लिंगानंद स्वामीजी, अ ब्लेम ऑफ गॉड, १९७३, पृ. १४.

१०. शेंडे एस. आर., मराठेकालीन महाराष्ट्रातील धार्मिक जीवन, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८९, पृ. ३४.

११. निकम गौतम, संतांचे सामाजिक व धार्मिक विद्रोह, विमलकिर्ती प्रकाशन, चाळीसगाव, २०१०, पृ. ७.

१२. उपरोक्त, पृ. ७.

१३. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ८४.

१४. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६९.
- निकम गौतम, उपरोक्त, पृ. ३६-३७.
१५. रोडे सोमनाथ, सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा बसवेश्वर, विद्याभरती प्रकाशन, लातूर, २०११. पृ. २२.
१६. फडकुले निर्मलकुमार, साहित्यातील सौंदर्य, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००५. पृ. १३८-१४०.
१७. लिगाडे जयदेवी, श्री सिध्दरामाची त्रिविधी, कन्नडकोटी प्रकाशन, सोलापूर, १९५८, पृ. ७.
१८. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८०.
१९. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८१.
२०. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. २१२.
२१. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८१.
२२. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. १.
२३. श्री सिध्देश्वर महात्म्य, श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी सिध्देश्वर मंदिर, २००९, पृ. ७.
२४. घुगरे सुर्यकांत, उपरोक्त, पृ. ३४५.
२५. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. ५-७.
२६. नंदी रमेंद्रनाथ, प्राचीन भारत में धर्म के सामाजिक आधार (अनु.), व्यास नरेंद्र, ग्रंथशिल्पी, नवी दिल्ली, २००८, पृ. १४७.
२७. शाबादे रेवण, उपरोक्त, पृ. ६७-६८.
२८. पसारकर शे. दे. (संपा.), श्री. सिध्देश्वरांची वचने, खंड-१, श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, सोलापूर, २०१०, प्रस्तावना, पृ. १०-१३.
२९. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६६-१६९.
३०. सोलापूर डिस्ट्रीक्ट गॅझिटिअर, १९७७, पृ. ११६.
३१. गोसावी र. रा., उपरोक्त, पृ. ३८२.
३२. चंद्रशेखर शिवाचार्य, वीरशैव अष्ठावरण विज्ञान, पृ. १.
३३. लिगाडे जयदेवी, उपरोक्त, पृ. १०.
३४. नंदी रमेंद्रनाथ, उपरोक्त, पृ. १४३.
३५. श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, गीत सिध्देश्वर,सोलापूर, १९७१, पृ. २५.
- श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटी, श्री सिध्दरामेश्वरांची वचने, खंड-१, सोलापूर, १९९८, पृ. १० (प्रस्तावना) .
३६. बामणगांवकर ना. रा., पुण्यश्लोक वारद, १९४९, सोलापूर, पृ. ३४.
३७. कुंभार आनंद, संशोधन तरंग, १९८८, पृ. ७०. (शिलालेख क्रमांक १, ओळ क्रमांक ९) (मल्लिकार्जून देवरिगे अणदूर मुन्नुर शेळगे बिट्ट आय मोनुगोम्मान्न भः).
३८. सोलापूर समाचार, १५ जानेवारी १९६४.
३९. पसारकर शे. द., (संपा.) श्री सिध्दरामेश्वरांची वचने, खंड-१, प्रस्तावना, पृ. १२.
४०. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, १९७७, पृ. ९८८.
४१. शेणोलीकर, देशपांडे, उपरोक्त, पृ. १६८.
४२. शाबादे रेवण, उपरोक्त, पृ. ४१-५४.